MHOS040006452026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २१३/२०२६**

**राजन फरताडे व इतर वि. निरंक**

**<u>निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत</u>**

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे</u> :-**

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, **कै. शिवगंगा गणपत फरताडे** हे **दिनांक २९/१२/२०२५** रोजी मौजे तुळजापुर, ता. तुळजापुर, जि. धाराशिव येथे मरण पावले आहेत. मयत **शिवगंगा गणपत फरताडे** हे मौजे तुळजापुर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील कायमचे रहिवाशी होते. मयत **शिवगंगा गणपत फरताडे** हे अर्जदार क्रं.१ ते ३ यांची आई आहे. मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांचे पती नामे गणपतराव महादेवराव फरताडे हे दिनांक १८/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांशिवाय मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना **शिवगंगा गणपत फरताडे** यांच्या मृत्यूनंतर ते कायदेशीर वारस असलेबाबत शासकीय व निमशासकीय कार्यालयात सादर करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दिनांक २१/०४/२०२६

रोजीचे 'दैनिक संघर्ष समाजवादाचा' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत (नि.क्रं.१०) वर दाखल आहे. अर्जदारांनी मयत **शिवगंगा गणपत फरताडे व गणपत महादेवराव फरताडे** यांचे मृत्यू प्रमाणपत्र अनुक्रमे (नि.क्रं.१२ व १३) वर दाखल केलेले आहे. पुढे अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रती (नि.क्रं.१४ ते १६) वर दाखल केलेले आहेत.

**४.** उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून अर्जदार हे मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु, आजतागायत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

**५.** अर्जदार क्र. १ राजन गणपतराव फरताडे पाटील यांनी त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्रं.११) वर दिले आहे. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र १. नामे– शिवाजी रामचंद्र सोमाजी यांनी (नि.क्र.१७) आणि अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र २. नामे– अमोल अरुणराव साठे यांनी (नि.क्र.१८) अन्वये पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. तदनंतर अर्जदारांनी प्रकरणात इतर पुरावा देणे नसल्याबाबतची पुरसीस (नि.क्रं.१९) वर दाखल केली आहे. नमुद शपथपत्रात साक्षीदारांनी अर्जदारांव्यतिरिक्त मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांचे इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमुद केले आहे. नमुद साक्षीदारांच्या शपथेतील कथने खोटी आढळल्यास त्याबाबत ते शिक्षेस पात्र राहतील.

६. उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता अर्जदार हे मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

<u>**आ दे श**</u>

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार **क्र. १. राजन गणपतराव फरताडे पाटील, २. वर्षा प्रशांत खोत व ३. मेघा गणपत फरताडे पाटील** (लग्नापुर्वीचे नाव)/**मेघा महेश यादव** (लग्नानंतरचे नाव) हे मयत **शिवगंगा गणपत फरताडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३) अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ नुसार देण्यात यावे.

स्वाक्षरी/-

दिनांक :-०२/०७/२०२६. (अ.रा. मुक्कनवार)
ठिकाण :- तुळजापूर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
तुळजापूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Rajiv Malkappa Kokare |
| Court | - | 3rd Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 02/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 02/07/2026 |
| Order uploaded on | - | 02/07/2026 |